# वसई विरार शहर महानगरपालिका
# वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.१२/०६/२०२४

## प्रेसनोट

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात " अतिसार नियंत्रण पंधरवडा " दि.०६/०६/२०२४ ते दि.२१/०६/२०२४ या कालावधीत राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमा अंतर्गत वैद्यकीय आरोग्य विभागामधील ए.एन.एम. व आशा कर्मचारी मार्फत घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यात येत असुन सर्वेक्षणा दरम्यान आरोग्य शिक्षण तसेच अतिसार झालेल्या बालकांना उपचाराकरीता ओ.आर.एस. (ORS) व झिंक गोळयांचे वाटप करण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या अतिसार नियंत्रण सर्वेक्षण अंतर्गत महानगरपालिकेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये ओ.आर.एस. (ORS) व झिंक कोप-यांची निर्मिती केली आहे. सदर ठिकाणी ओ.आर.एस. (ORS) बनवण्याबाबतचे प्रात्यक्षिक, हात धुण्याचे प्रात्यक्षिक व स्वच्छतेचे महत्त्व याबाबत माहिती व जनजागृती करण्यात येत आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रात आजतागयत २२१२९ बालकांचा सर्वे करण्यात आलेला असुन त्यांच्या पालकांना ओ.आर.एस. (ORS) बनवण्याबाबतचे प्रात्यक्षिक, हात धुण्याचे प्रात्यक्षिक व स्वच्छतेचे महत्त्व सांगण्यात आले आहे. या सर्वे दरम्यान एकुण ६२ बालकांना सौम्य अतिसाराची लक्षणे आढळुन आली असुन त्यांना ए.एन.एम. व आशा कर्मचारी यांच्या मार्फत ओ.आर.एस. (ORS) व १४ दिवसांकरीता झिंक गोळया वाटप करण्यात आल्या आहेत. तसेच ७ बालकांना महानगरपालिकेच्या रुग्णालयात संदर्भित करण्यात आले असुन त्यांची प्रकृती स्थिर आहे.

महानगरपालिकेच्या प्र.मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्याकडुन असे आवाहन करण्यात येते की, नागरिकांनी पाणी उकळुन प्यावे, उघडयावरचे अन्नपदार्थ खाणे टाळावे, पालेभाज्या धुवून खाव्यात, हात स्वच्छ ठेवावेत. तसेच अतिसाराचे लक्षणे आढळल्यास नजिकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आशा व ए.एम.एम. यांच्याशी संपर्क साधावा.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**